# पुणे महानगरपालिका.

## जाहिरात प्रकटन

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध पदांसाठी निवडयादी /प्रतिक्षायादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>पदनाम</th><th>वेतनश्रेणी</th><th>शैक्षणिक पात्रता व अनुभव</th><th>पदांची संख्या</th><th colspan="2">गट</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>सिस्टिम मॅनेजर (ई-प्रशासन)</td><td>वे.श्रे. रु.१०६५० ते १५८५०+ मान्य भत्ते. (सुरुवातीस मिळणारे एकत्रित मासिक वेतन अंदाजे रक्कम रु.२४३०२/-)</td><td>बी.ई./बी.टेक. इन इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन/बी.ई इलेक्ट्रॉनिक्स/कॉम्प्युटर सायन्स/कॉम्प्युटर इंजिनिअर किमान ३ वर्षाचा सरकारी / निमसरकारी अथवा नामांकित मान्यताप्राप्त संस्थेतील विशेषत: ERP/SAP कामाचा अनुभव आवश्यक.</td><td>१</td><td colspan="2">खुला</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>संगणक प्रोग्रॅमर</td><td>वे.श्रे. रु.५५०० ते १२८५०+ मान्य भत्ते. (सुरुवातीस मिळणारे एकत्रित मासिक वेतन अंदाजे रक्कम रु.१२६२६/-)</td><td>मान्य विद्यापीठाची कॉम्प्युटर सायन्समधील पदवी व ऑपरेटिंग कॉम्प्युटरचा चार वर्षांचा अनुभव याशिवाय कॉम्प्युटर मधील फॉक्सबेस, फॉक्सप्रो, सॉफ्टवेअर व लॅन/युनिक्स ऑपरेटिंग सिस्टिम<br>अथवा<br>मान्य विद्यापीठाची पदवी, शासकीय मान्यताप्राप्त असलेल्या इन्स्टिट्यूट मधील कमीत कमी सहा महिने शिक्षण घेतलेली कॉम्प्युटर पदविका. कॉम्प्युटर हाताळण्याचा प्रत्यक्षात घेतलेला अनुभव आणि फॉक्सबेस, फॉक्सप्रो, सॉफ्टवेअर व लॅन/युनिक्स ऑपरेटिंग सिस्टिम, पॅकेजिंग इ. हाताळण्याचा अनुभव.</td><td>१</td><td colspan="2">अनुसूचित जमाती</td><td></td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">ज्युनिअर ग्रेड लेखनिक</td><td rowspan="2">वे.श्रे. रु.३०५० ते ७१५०+ मान्य भत्ते. (सुरुवातीस मिळणारे एकत्रित मासिक वेतन अंदाजे रक्कम रु.७०५७/-)</td><td rowspan="2">एस.एस.सी अगर तत्सम परिक्षा किमान ४५% गुण मिळवून उत्तीर्ण , शासनमान्य मराठी टंकलेखन ३० श. प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण (म.न.पा.सेवकांसाठी गुणांची टक्केवारीची अट लागू नाही) प्राधान्य:- १) पदवीधर शास्त्र , वाणिज्य आणि कला<br>२) ॲडव्हान्स डिप्लोमा इन कॉम्प्युटर सॉफ्टवेअर व सिस्टीम ॲनॅलिसिस- मान्य विद्यापीठाचा १ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण अथवा डिप्लोमा इन कॉम्प्युटर मॅनेजमेंट- मान्य विद्यापीठाचा १ वर्षाचा कोर्स उत्तीर्ण.</td><td rowspan="2">९१ निवड यादी,<br><br>१४ प्रतिक्षा यादी</td><td>९१ निवड यादी</td><td>१४ प्रतिक्षा यादी</td><td rowspan="2">(अल्प दृष्टी/कर्णबधीर - श्रवणयंत्राने ऐकू शकणारे/अस्थिव्यंग अपंग प्रवर्गासाठी ५ जागा निवड यादी, ५ जागा प्रतिक्षा यादी )</td></tr>
<tr><td>अजा ६<br>अज १२<br>इमाव ३३<br>खुला ४०</td><td>अजा ५<br>अज २<br>इमाव २<br>खुला ५</td></tr>
</table>

## अटी:-

१) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक.

२) वयोमर्यादा :- जाहिरातीचे दिनांकास खुला गटातील उमेदवारांसाठी ३३ वर्षे तसेच मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे.अपंग,प्रकल्पगस्त, माजी सैनिक यांसाठी ४५ वर्षे .(वयोमर्यादेबाबत मे.राज्य शासनाचे निर्णय लागू राहतील.)

--२/--

३) शारिरीक अपंग व्यक्तीसाठी राखीव पदावरील नियुक्ती संबंधित प्रवर्गाचे किमान ४०% अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्याच्या शासकिय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकिय तज्ज्ञाने दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक.

४) खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारांना रु. ५०/-किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा.सह महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली **१)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.१. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालया समोर,पुणे ४, **२)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.२. ढोलेपाटीलरोड क्षेत्रिय कार्यालय, ढोलेपाटील मार्केट इमारत,पुणे १.**३)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.३.-कसबापेठ क्षेत्रिय कार्यालय, जुना बाजार रस्ता ,शिवजी स्टेडियमशेजारी,कसबापेठ,पुणे ११,**४)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.४.- टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय,९९०,शुक्रवारपेठ,शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड,पुणे ३०.येथे दि.४/७/२००७ ते दिनांक २१/७/२००७ अखेर(पर्यंत)कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दिनांक २३/७/२००७ दुपारी ४.०० पर्यंत स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.

**५) पुणे महानगरपालिकेच्या सेवकांना एकवट वेतनाची व वयाची अट लागू होणार नाही.**

६) अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या दाखल्यांच्या प्रमाणित केलेल्या सत्य प्रती(ट्रू-कॉपी) जोडणे आवश्यक आहे. उमेदवार मागासवर्ग गटातील असल्यास जातीच्या दाखल्याची सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेली प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे. **निवड झालेल्या अ.ज. गटातील उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना संबंधित पदावर रूजू करून घेतले जाणार नाही.**

७) अपुर्ण भरलेले अर्ज अगर वरीलप्रमाणे अर्जासोबत दाखल्याच्या प्रमाणित सत्यप्रती(ट्रू-कॉपी) जोडले नसलेले अर्ज तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

८) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना राहतील.

**९) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.**

१०) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

११) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१३) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-१०९३/प्र.क्र.३६६/का-२दि.२२/६/९४ महिलांसाठी असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.

१४) महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक,

१५) शासन आदेशानुसार प्रकल्प ग्रस्तांसाठी आवश्यक असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील. पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पांसाठी प्राधान्य.

१६) शासन आदेशानुसार माजी सैनिक, खेळाडू, अपंग यांचेसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील.

१७) मे. महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर व्ही २०००/प्र.क्र. १७/२०००/१२ दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१८) रिक्त जागांच्या संख्येत कमी अधिक बदल होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

१९) पदाच्या आढाव्याअंती सदर पदे अतिरिक्त ठरल्यास मान्यता आदेश आपोआप रद्द होतील.

सही/-प्रविण परदेशी

पुणे

**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका.**